महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-एमआयएस-०१२०/सीआर-१८/२०२०/तेवीस दिनांक ६ ऑगस्ट, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१९ व महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा २०१९ करीता पदांचे पसंतीक्रम निवडीबाबत**

संदर्भ:-(१) अधिसुचना क्रमांक १२/२०१९
(२) अधिसूचना क्रमांक १७/२०१९.
(३) महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१९ करीता पसंतीक्रम निवडीसंदर्भातील दिनांक ४ ऑगस्ट, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१९ च्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांना अधिसूचित पदांचा पसंतीक्रम निवडण्यासंदर्भात आयोगाच्या दिनांक ४ ऑगस्ट, २०२१ रोजी प्रसिध्दीपत्रकाद्वारे सूचना करण्यात आली होती. सदर प्रसिध्दीपत्रकाच्या अनुषंगाने पदांचे पसंतीक्रम निवडीसंदर्भात उमेदवारांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:-

(१)आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Post Preference या लिंकवर क्लिक करावे.

(२) संबंधित परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करुन सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करुन लॉगीन करावे.

(३) संबंधित परीक्षा निवडून उपलब्ध होणा-या नमुन्यामध्ये पदांचे पसंतीक्रम नमूद करण्यात यावेत.

२. महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा २०१९ चा सुधारित निकाल दिनांक २२ जुलै, २०२१ रोजी जाहीर करण्यात आला असून सदर निकालाच्या अनुषंगाने शैक्षणिक अर्हतानिहाय पदांचे पसंतीक्रम सादर करण्याकरीता वेबलिंक सुरु करण्यात येत आहे. प्रस्तुत परीक्षेकरीता दिनांक २२ जुलै, २०२१ रोजी जाहीर करण्यात आलेल्या निकालानुसार व यापूर्वी दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी जाहीर करण्यात आलेल्या निकालानुसार मुलाखतीस पात्र ठरलेल्या संबंधित उमेदवारांनी अधिसूचित पदांच्या पसंतीक्रमाबाबत उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

३. प्रस्तुत दोन्ही परीक्षांकरीता **दिनांक १५ ऑगस्ट, २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यंत** पदांचे पसंतीक्रम सादर करता येतील.

४. विहित कालावधीनंतर पसंतीक्रम सादर करण्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. तसेच, विहित पध्दतीने व विहित कालावधीमध्ये पदांचा पसंतीक्रम सादर न करणा-या उमेदवारांचा अंतिम शिफारशीसाठी विचार करणे शक्य होणार नाही.

ठिकाण:-मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग